**MHWS**020003992021

## निशाणी क्र. ५ खाली आदेश

वादीने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रीया संहिता आदेश–३९ नियम –१ व २ अन्वये तुर्तातुर्त मनाई हुकुम मिळण्यासाठी दाखल केलेले आहे.

**वादीचे कथने संशिप्तपणे खालील प्रमाणे आहेत –**

०२. मौजे कोकलगाव, तालुका व जिल्हा वाशिम येथील शेत जमीन गट क्रमांक १०२ मधील क्षेत्र ०.४० आर, गट क्रमांक २९४ मधील क्षेत्र ०.०६ आर, गट क्रमांक ४४५ मधील क्षेत्र ०.१२ आर, गट क्रमांक ४४६ मधील क्षेत्र ०.०६ आर, गट क्रमांक ७७ मधील क्षेत्र १.३८ आर व गट क्रमांक ८० मधील क्षेत्र ०.११ आर, या अर्जाच्या परिषेद क्र.१ मध्ये चतुःसिमेसह नमुद केलेली मिळकत (संक्षीप्तेसाठी यापुढे दावा मिळकती असे संबोधण्यात येत आहे). सदरच्या दावा मिळकती या वडीलोपार्जीत हक्कातील व वादीने स्वकष्टातुन कमावलेल्या आहेत. सदरच्या दावा मिळकती या वादीच्या वहिवाटीच्या व वहितीच्या आहेत. सदर दावा मिळकती वादी हा स्वतः वहिती करत असुन त्यामध्ये तो गहु, ज्वारी, सोयाबीन अशा प्रकारचे पिक घेत असतो. तसेच वादी हा मालकी हक्काने शेतसारा सुध्दा देतो. वादीला दोन मुले असुन प्रतिवादी हा वादीचा लहान मुलगा आहे. प्रतिवादीचा दावा मिळकतीशी कोणताही संबंध नाही. असे असतांना ही प्रतिवादी केवळ स्वार्थ बुध्दीने वादीच्या ताब्यातील सदर दावा मिळकतीवर बळजबरीने ताबा करु ईच्छीत आहे.

०३. वादीने त्यास विनंती केली असता प्रतिवादीने त्याला चापटा बुक्यांनी

मारहाण केली. या संदर्भात वादीने पोलीस स्टेशन वाशिम ग्रामिण येथे रिपोर्ट सुध्दा दिला आहे. वादी हा ५८ वर्षाचा वयोवृध्द असुन प्रतिवादी हा नवयुवक आहे. त्यामुळे वादीला प्रतिवादीची जास्त भिती वाटत आहे. प्रतिवादीने वादीच्या पेरणी कामाकरीता व वहिती करीता हरकत घेतल्यास वादीचे कधीही न भरुन निघणारे नुकसान होणार आहे. दि. २२.०६.२०२१ रोजी वादी हा पेरणी करण्या करीता सर्व तयारीनिशी व बी बियाने तसेच खत घेऊन दावा मिळकतीमध्ये गेला असता प्रतिवादीने त्याच्या पत्नीकडील नातेवाईकासह सदर दावा मिळकती मध्ये येवुन बळाचा वापर करुन वादीची पेरणी अडविली. तसेच वादीने त्यास माझे शेत आहे मी पेरणी करणारच असे म्हटले असता प्रतिवादीने त्यास चापटा बुक्यांनी मारहाण केली व गलीच्छ शिवीगाळ करुन प्रतिवादीच्या पत्नीच्या नातेवाईंकांनी पेरणीच्या सामानांची फेकाफेक केली व पेरणी करायची नाही केल्यास तुमचे हातपाय तोडुन टाकु अशी धमकी दिली. त्यामुळे वादी हा भितीने पेरणी न करता परत आला. प्रतिवादी हे वादीला दावा मिळकतीच्या ताब्यापासुन कधीही बेदखल करतील याची खात्री नसल्यामुळे वादीने सदरचा तात्पुरता मनाई हुकुमाचा अर्ज दाखल केला आहे.

०४.        प्रतिवादी हा दाव्याचे समन्स मिळाल्यानंतर वकीलामार्फत हजर झाला व त्याने निशाणी क्र. १४ वर कैफियत / म्हणणे दाखल केले. प्रतिवादी याने दावा मिळकती या वडीलोपार्जीत मिळकत असल्याचे मान्य केले परंतू दावा मिळकती या वादीने स्वःकष्टातून कमावलेल्या आहेत व त्या वादीच्या वहीतीत आहेत हे नाकारले. प्रतिवादीने वादीची दावा मिळकतीवरील मालकी व ताबा नाकारुन दाव्यातील इतर सर्व कथने नाकारली आहेत. प्रतिवादी याच्या कथनानुसार दावा मिळकती या वडीलोपार्जीत मिळकती आहेत. तसेच दावा मिळकतीमधील अल्पशी शेती वादी व प्रतिवादी यांनी एकत्र कुटुंबात राहून सर्वानी मोलमजुरी व मेहनत करुन कमावलेली आहे. त्यामुळे संपुर्ण

दावा मिळकतीमध्ये वादी व प्रतिवादी यांचा समान हिस्सा, समान मालकी हक्क व समान ताबा आहे.

०५. फेब्रुवारी २०१५ मध्ये वादी व प्रतिवादी हे एकाच कुटुंबातील असल्यामुळे त्यांनी कुटुंबातील ईतर सदस्यांना एकत्र बसवुन आपसात तोंडी वाटण्या केल्या. सदर वाटण्यानुसार वादीने व कुटुंबातील ईतर सदस्यांनी सहमीतीने प्रतीवादी याला दावा मिळकतीमधील गट नं. ७७ मधील १ हे. ३८ आर पैकी पश्चिमेकडून ० हे. ८२ आर शेतजमीन प्रतिवादीला उपजिविकेकरीता दिली होती. सदरची शेतजमीन प्रतिवादीच्या मालकी हक्कात, ताब्यात व वहितीमध्ये आहे. सदर शेतजमीनीमध्ये प्रतिवादी हा सन २०१५ पासुन नियमीत पीकांची पेरणी करुन त्यापासुन उपजिवीका भागवितो. तसेच प्रतिवादीने याही वर्षी सदर शेतजमीनीमध्ये तुर व सोयाबिन या पिकाची पेरणी केली आहे. या पैकी सायाबिन या पिकांची काढणी झाली असून तुरीचे पिक उभे आहे व त्याची देखरेख प्रतिवादी करतो.

०६. तसेच ईतर दावा मिळकतीत सुध्दा प्रतिवादी याच्या ताब्यामध्ये व वहितीमध्ये आहे, कारण प्रतिवादी हा वादीच्या कुटुंबाचा हिस्सा आहे. त्यामुळे प्रतिवादी हा कुटुंबाची जमीन म्हणून त्या जमीनीची सुध्दा वहिती करतो. वादी हा वयोवृध्द असून परस्त्रीसोबत वाशिम येथे राहतो. त्यामुळे वादीचा दावा मिळकतीशी प्रत्यक्ष कोणताही संबंध नाही. ते फक्त वडील म्हणून त्याचे नाव सात बारा उता–यात नामधारी स्वरुपात आहेत. त्यांनी सदरचा दावा प्रतिवादीला त्रास देण्याच्या उद्येशाने दाखल केला आहे. तसेच वादीने बरेच वेळेस प्रतिवादीला मारहान केली आहे. त्यामुळे प्रतिवादीचे शारीरिक व आर्थिक नुकसान झालेले आहे. दावा मिळकतीवर वादीचा एकटयाचा मालकी हक्क, हितसंबंध व अधिकारी ताबा नाही. त्यामुळे वादीचा सदरचा अर्ज खारीज करण्यात यावा.

०७. या अर्जाच्या निर्णयारिता खालील मुद्दे माझ्या निर्देशनास येतात. त्या मुद्यांचे पुढील कारणास्तव मी माझे निष्कर्ष देत आहे.

| मुददे | निष्कर्ष |
|---|---|
| १. वादी त्याच्या हक्कामध्ये प्रथम दर्शनी केस शाबित करतो काय ? | होय |
| २. न्यायाचा समतोल आपल्या बाजुने असल्याचे वादी शाबित करतो काय ? | होय |
| ३. तुर्तातुर्त मनाई न दिल्यास आपली अपरिमीत हानी होणार असल्याचे वादी शाबित करतो काय ? | होय |
| ४. मागणीनुसार तुर्तातुर्त मनाई मिळण्यास वादी पात्र आहे काय ? | होय |
| ५. हुकुम काय ? | अंतिम आदेशा प्रमाणे |

## का र ण मि मां सा

०८. अर्जातील कथनाच्या बाजुने वादीने दाखल केलेली कागदपत्रे गट नं. १०२ चा सातबारा उतारा, गट नं. २९४ चा सातबारा उतारा, गट नं. ४४५ चा सातबारा उतारा, गट नं. ४४६ चा सातबारा उतारा, गट नं. ७७ चा सातबारा उतारा,गट नं. ८० चा सातबारा उतारा, नमुना नं. ८ ची नक्कल , फेरफार क्र. १०८६, ६१८,६०६,४७९ व ४५८ ची नक्कल व नमुना नं. ८ अ चा उतारा असे कागदपत्र अभिलेखावर दाखल केले आहेत. प्रतिवादी याने एकही कागदपत्र दाखल केलेला नाही.

**मुददा क्र १ ते ४ करीता** :

०९. तुर्तातुर्त मनाई हुकुम हा एक विवेकाधिकार व समन्वयी दाद आहे. वादीला तुर्तातुर्त मनाई हुकुम मिळण्यासाठी तीन मुद्दे म्हणजेच सकृतदर्शनी केस, सोयीचा समतोल व अपरिमीत नुकसान या बाबी प्रथमदर्शनी शाबीत करणे आवश्यक आहे. त्याच प्रमाणे वादीने कोणतीही बाब लपवुन न ठेवता न्यायालया समोर स्पष्ट हकीकत मांडणे जरुरीचे आहे. प्रस्तुतचा दावा वादीने प्रतिवादी विरुध्द कायम मनाई हुकुमासाठी दाखल केलेला असुन तुर्तातुर्त मनाई अर्जाद्वारे वादीने प्रतिवादीने त्याच्या मालकी व ताब्यात असलेल्या दावा मिळकतीमध्ये कुठलाही अडथळा करु नये असा तुर्तातुर्त मनाई हुकुम मागितला आहे. वादीच्या कथनांवरुन व अभिलेखावर उपलब्ध कागदपत्रांवरुन वादीने प्रतिवादी विरुध्द तुर्तातुर्त मनाई हुकुम मिळण्यासाठी समर्थनीय व परिपोषक पुराव्याच्या आधारे सकृतदर्शनी केस शाबीत केली आहे काय हे पाहणे आवश्यक आहे.

१०. वादीच्या कथनाप्रमाणे दावा मिळकती या वडीलोपार्जीत मालकी हक्कातील व स्वकष्टातुन कमावलेली व त्याच्या वहितीची आहे. वादी हा सदरच्या दावा मिळकती स्वतः वहिती करतो तसेच तो मालकी हक्काने शेत सारा सुध्दा देतो. वादीने त्याच्या कथनाच्या पृष्ठ्यार्थ दावा मिळकतीचे सात बारा उतारे, नमुना नंबर ८ व फेरफार उतारे दाखल केलेले आहेत. सदरील दस्ता ऐवजांचे अवलोकन केले असता प्रथमदर्शनी असे दिसुन येते की, वादी हा दावा मिळकतीच्या ताब्यात आहे. या उलट प्रतिवादीच्या कथनाप्रमाणे प्रतिवादी हा वादीचा मुलगा असुन ते एकाच कुटुंबातील असल्यामुळे त्यांनी व कुटुंबातील ईतर सदस्यांनी एकत्र बसुन आपसात तोंडी वाटण्या केल्या. सदर वाटण्यानुसार वादीने व कुटुंबातील ईतर सदस्यांनी सहमीतीने प्रतीवादी याला दावा मिळकतीमधील गट नं. ७७ मधील १ हे. ३८ आर पैकी पश्चिमेकडून ० हे. ८२ आर शेतजमीन प्रतिवादीला उपजिविकेकरीता दिली होती.

११. सदरची शेतजमीन प्रतिवादीच्या मालकी हक्कात, ताब्यात व वहितीमध्ये

आहे. सदर शेतजमीनीमध्ये प्रतिवादी हा सन २०१५ पासुन नियमित पीकांची पेरणी करुन त्यापासुन उपजिवीका भागवितो. तसेच प्रतिवादीने याही वर्षी सदर शेतजमीनीमध्ये तुर व सोयाबिन या पिकांची पेरणी केली आहे. या पैकी सायाबिन या पिकांची काढणी झाली असून तुरीचे पिक उभे आहे व त्याची देखरेख प्रतिवादी करतो. तसेच ईतर दावा मिळकतीत सुध्दा प्रतिवादी याच्या ताब्यामध्ये व वहितीमध्ये आहे, कारण प्रतिवादी हा वादीच्या कुटुंबाचा हिस्सा आहे. त्यामुळे प्रतिवादी हा कुटुंबाची जमीन म्हणून त्या जमीनीची सुध्दा वहिती करतो. परंतु प्रतिवादीने तो दावा मिळकती वहिती करत असल्याबाबतचा तसेच दावा मिळकती त्याच्या ताब्यात असल्याबाबतचा कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. त्यामुळे दावा मिळकती प्रतिवादीच्या ताब्यात असल्याबाबतचे प्रथमदर्शनी दिसुन येत नाही.

१२. दावा मिळकतीमधील काही मिळकती वडीलोपार्जीत असल्याचे दोन्ही पक्षांना मान्य आहे. परंतु वादीने दावा मिळकती या त्याच्या ताब्यात व कब्जेत असल्याबाबत वर नमुद केल्याप्रमाणे प्रथमदर्शनी सिध्द केले आहे. या उलट प्रतिवादीने तो दावा मिळकतीच्या ताब्यात असल्याबाबत एकही कागदोत्री पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही.

१३. वादीच्या कथनाप्रमाणे दि. २२.०६.२०२१ रोजी वादी हा पेरणी करण्या करीता सर्व तयारीनिशी व बी बियाने तसेच खत घेऊन दावा मिळकतीमध्ये गेला असता प्रतिवादीने त्याच्या पत्नीकडील नातेवाईकासह सदर दावा मिळकती मध्ये येवुन बळाचा वापर करुन वादीची पेरणी अडविली. तसेच वादीने त्यास माझे शेत आहे मी पेरणी करणारच असे म्हटले असता प्रतिवादीने त्यास चापटा बुक्यांनी मारहाण केली व गलीच्छ शिवीगाळ करुन प्रतिवादीच्या पत्नीच्या नातेवाईंकांनी पेरणीचे सामानांची फेकाफेक केली व पेरणी करायची नाही केल्यास तुमचे हातपाय तोडुन टाकु अशी धमकी दिली. त्यामुळे वादी हा भितीने पेरणी न करता परत आला. सदरची बाब

प्रतिवादीने नाकारली असली तरी वर नमुद केल्याप्रमाणे वादीच्या बाजुने प्रथमदर्शनी केस दिसुन येते. त्यामुळे सदरचा तात्पुरत्या मनाई हुकुमाचा अर्ज खारीज केल्यास वादीचे नुकसान होईल.

१४. वरील सर्व बाबींचे अवलोकन केले असता प्रथमदर्शनी असे दिसुन येते की, वादीचा दावा मिळकतीवर ताबा आहे. तुर्तातुर्त मनाई हुकुम मिळवण्यासाठी वादीला प्रथमदर्शनी केस त्याच्या बाजुने आहे हे शाबीत करणे गरजेचे आहे. वर नमुद केल्याप्रमाणे वादीने दावा मिळकती त्याच्या ताब्यात असल्याचे प्रथमदर्शनी सिध्द केले आहे. त्यामुळे वादीच्या बाजुने सोईचा समतोल दिसुन येतो. त्यामुळे जर वादीला तुर्तातुर्त मनाई हुकुम न दिल्यास वादीचे अपरिमीत नुकसान होईल. त्यामुळे वादी हा तुर्तातुर्त मनाई हुकूम मिळण्यास पात्र आहे. म्हणुन मी मुद्दा क्र. १ ते ४ चे निष्कर्ष होकारार्थी नोंदवित आहे. सबब मुददा क्र. ५ च्या उत्तरार्थ मी खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१. अर्ज निशाणी क्रमांक ५ हा मंजुर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादीने, तसेच त्याचे नातेवाईक, हितसंबंधी व नौकर–चाकर यांनी सदरील दाव्याचा निकाल लागेपर्यंत वादीच्या ताब्यात असलेल्या दावा मिळकतीत अडथळा करु नये म्हणुन प्रतिबंधीत करण्यात येत आहे.

३. प्रस्तुत अर्जाचा खर्च दाव्याच्या अंतिम निर्णयावर अवलंबुन राहील.

Digitally signed by ROHINI BALIRAMJI SOREKAR

( आर.बी.सोरेकर )

दिनांक :– १७.११.२०२२ २ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, वाशिम

**Certificate**

I affirm that the contents of this P.D.F file Judgment/Order are same word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Court Name | :- | Smt R.B.Sorekar,<br>2nd Jt.C.J.J.D & J.M.F.C,Washim |
| Date | :- | 17.11.2022 |
| Order signed by the presiding officer on | :- | 17.11.2022 |
| Order uploaded on | :- | 19.11.2022 |
| Order uploaded by | :- | A.R.Tayade. Stenographer (Grade-III) |